International Journal of Humanities and Social Science Research
www.socialsciencejournal.in
ISSN: 2455-2070
Received: 25-07-2025, Accepted: 24-08-2025, Published: 09-09-2025
Volume 11, Issue 5, 2025, Page No. 34-37

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शिक्षण व तत्त्वज्ञानात्मक विचार : एक अभ्यास

**डॉ. दिलीप किसन राठोड**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, सहयोग सेवाभावी संस्था, अध्यापक महाविद्यालय विष्णुपूरी, नांदेड, महाराष्ट्र राज्य, भारत

**सारांश**
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रपुरुष होते. त्यांचे शिक्षणविषयक आणि तत्त्वज्ञानात्मक विचार आजच्या काळातही तितकेच उपयुक्त व प्रेरणादायी आहेत. प्रस्तुत संशोधनात त्यांच्या जीवनकार्याचा, शिक्षणविषयक विचारांचा, तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनाचा तसेच आजच्या शैक्षणिक व्यवस्थेशी असलेल्या संदर्भांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाद्वारे आधुनिक भारतीय शिक्षणातील मूल्ये, नीतिमत्ता, आध्यात्मिकता, आणि सामाजिक जबाबदारी या अंगांना अधोरेखित केले गेले आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) आणि डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांतील साम्य शोधून शिक्षणाच्या भविष्यकालीन दिशादर्शनासाठी उपयुक्त सूचना दिल्या आहेत.

**मूलशब्दः** डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, शिक्षणविषयक विचार, तत्त्वज्ञानात्मक चिंतन, आधुनिक भारतीय शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, मूल्यनिष्ठ शिक्षण, सामाजिक परिवर्तन

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तिरुतणी (आंध्रप्रदेश) येथे झाला. ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे मुख्य योगदान शिक्षण क्षेत्रात व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात होते. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचे जागतिक स्तरावर प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आपण "शिक्षक दिन" साजरा करतो. प्रस्तुत संशोधनामध्ये त्यांच्या शिक्षणविषयक व तत्त्वज्ञानात्मक विचारांचा सखोल अभ्यास केला आहे. आजच्या बदलत्या शैक्षणिक संदर्भात राधाकृष्णन यांचे विचार किती उपयुक्त आहेत याचा शोध घेणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.

## समस्या विधान

### आधुनिक काळात शिक्षण व्यवस्थेत अनेक आव्हाने आहेत

व्यापारीकरण, स्पर्धात्मकता, मूल्यांचा अभाव, तंत्रज्ञानाचा अतिरेक. अशा वेळी भारतीय संदर्भात तत्त्वज्ञानाधारित शिक्षणाची गरज जाणवते. डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांद्वारे ही पोकळी भरून निघू शकते का, हा अभ्यासाचा मुख्य प्रश्न आहे. त्यांचे विचार आजच्या शिक्षण प्रणालीसाठी किती सुसंगत आहेत याचे चिकित्सक विश्लेषण आवश्यक आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, लेखक व राष्ट्रपती म्हणून भारतीय समाजाच्या विविध अंगांना प्रभावित करणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान हे भारतीय परंपरेवर आधारित असून त्यात आधुनिक पाश्चिमात्य विचारांचा संगमही दिसून येतो.

### तथापि, खालील समस्या निदर्शनास येतात

- त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक विचारांचे आधुनिक काळातील शिक्षण प्रणालीशी कितपत साधर्म्य आहे?
- राधाकृष्णन यांचे आदर्श आजच्या शिक्षण धोरणांमध्ये व विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP2020) मध्ये कितपत उपयुक्त ठरतात?
- त्यांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाचा आजच्या विज्ञान–तंत्रज्ञानाधारित शिक्षणाशी काय संबंध आहे?
- विद्यार्थ्यांच्या चारित्र्य, नीतिमूल्ये व व्यक्तिमत्व विकासात राधाकृष्णन यांच्या विचारांचा किती प्रभाव होऊ शकतो?

या सर्व प्रश्नांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करणे, विश्लेषण करणे व निष्कर्ष मांडणे हेच या संशोधनाचे मुख्य समस्या विधान आहे.

## संशोधनातील कार्यात्मक व संकल्पनात्मक व्याख्या

### कार्यात्मक व्याख्या

- **शिक्षण:** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास करणारी प्रक्रिया.
- **तत्त्वज्ञान:** सत्य, मूल्ये आणि जीवनाच्या अंतिम उद्देशाचा शोध घेणारी प्रक्रिया.
- **डॉ. राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान:** भारतीय वेदान्त व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा समन्वय.
- **संशोधन:** डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवन, कार्य व विचारांचे सखोल, चिकित्सक व तुलनात्मक विश्लेषण.

### संकल्पनात्मक व्याख्या

1. **शिक्षण:** व्यक्तीच्या ज्ञान, कौशल्य, चारित्र्य व जीवनमूल्यांचा सर्वांगीण विकास करणारी सतत चालणारी प्रक्रिया.
2. **तत्त्वज्ञान:** सत्य, ज्ञान, मूल्ये व जीवनाचे उद्दिष्ट यांचा अभ्यास करणारी शाखा.
3. **शैक्षणिक तत्त्वज्ञान:** शिक्षणाची उद्दिष्टे, पद्धती, अभ्यासक्रम व परिणाम यांचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा.
4. **मानवतावाद:** प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठा, मूल्य व समानतेला महत्त्व देणारा विचारसरणीचा दृष्टिकोन.
5. **संशोधन:** एखाद्या विषयाचा सखोल, शास्त्रीय व पद्धतशीर अभ्यास करून नवे निष्कर्ष मांडण्याची प्रक्रिया.

## संशोधनाची गरज

- आजच्या शिक्षणात नीतिमत्ता व मूल्यांचा अभाव.
- शिक्षक–विद्यार्थी नातेसंबंध कमी होणे.
- तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे अध्यापनातील मानवी मूल्यांची घट.
- NEP 2020 मध्ये ज्या मूल्यनिष्ठ शिक्षणावर भर देण्यात आला आहे, त्याची मुळे राधाकृष्णन यांच्या विचारांत आढळतात.
- म्हणूनच त्यांच्या विचारांचा अभ्यास आवश्यक आहे.
- भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठानाची उणीव जाणवते.
- मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या संदर्भात राधाकृष्णन यांच्या विचारांची सुसंगती तपासण्याची आवश्यकता आहे.

- नवीन शैक्षणिक धोरणांत (NEP 2020) तत्त्वज्ञानात्मक परंपरेचा उपयोग समजून घेणे महत्त्वाचे आहे.
- शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरू शकतील अशा विचारांची निवड करून प्रत्यक्ष जीवनात लागू करण्याची गरज आहे.
- भारतीय व पाश्चिमात्य शिक्षण विचारांचा सेतू बांधणारे राधाकृष्णन यांच्या तत्त्वज्ञानाचा आधुनिक संदर्भात अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे महत्त्व**
- भारतीय शिक्षण परंपरेचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी उपयुक्त.
- शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी.
- शिक्षणातील नैतिक व आध्यात्मिक मूल्ये जपण्यास मदत करणारे.
- NEP 2020 च्या संदर्भात भविष्यकालीन शिक्षण धोरणासाठी दिशादर्शक.
- समाजपरिवर्तनासाठी मूल्यनिष्ठ शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे.
- भारतीय तत्त्वज्ञान व आधुनिक शिक्षण प्रणाली यांच्यातील दुवा स्पष्ट होईल.
- शिक्षकांना मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धतीची दिशा मिळेल.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्त्वज्ञानात्मक आधार मिळेल.
- आधुनिक काळात विसरले जाणारे नैतिक मूल्ये पुन्हा दृढ करता येतील.
- शैक्षणिक धोरणकर्त्यांना (च्वसपबल डांमते) मार्गदर्शन मिळू शकेल.

**संशोधनाची उद्दिष्टे**
1. डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे.
2. डॉ. राधाकृष्णन यांच्या शिक्षणविषयक विचारांचे विश्लेषण करणे.
3. डॉ. राधाकृष्णन यांच्या तत्त्वज्ञानात्मक विचारांचे चिकित्सक मूल्यमापन करणे.
4. डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांचा आधुनिक शिक्षण व्यवस्थेत उपयोग शोधणे.
5. NEP 2020 शी डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांची तुलना करणे.
6. भविष्यातील शिक्षण सुधारणा यासाठी शिफारसी सुचवणे.

**संशोधनाची गृहितके**
**या संशोधनात पुढील गृहितके मांडलेले आहेत**
1. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान आजच्या शिक्षण क्षेत्रात उपयुक्त ठरते.
2. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मानवतावादी दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांच्या चारित्र्य, नीतिमूल्ये व व्यक्तिमत्व विकासास चालना मिळते.
3. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांचा राष्ट्रीय शिक्षण धोरण– 2020 (NEP 2020) मधील मूल्याधिष्ठित शिक्षणाशी साधर्म्य आहे.
4. शिक्षकांच्या भूमिकेबाबत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या तत्त्वज्ञानाचा आधुनिक शिक्षकवर्गासाठी प्रेरणादायी उपयोग होतो.
5. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान भारतीय व पाश्चिमात्य शिक्षण विचारांत सेतू म्हणून कार्य करते.

**संशोधन परिकल्पना**
- शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून ते जीवनमूल्यांचा विकास घडवते.
- भारतीय शिक्षण प्रणालीचा पाया तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे.
- मूल्याधिष्ठित व व्यक्तिमत्वविकासाभिमुख शिक्षणच समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेऊ शकते.
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान हे आधुनिक समाजासाठी सदैव प्रासंगिक आहे.
- तंत्रज्ञानप्रधान युगातही नैतिकता व मूल्यांची जपणूक ही शिक्षणाची अनिवार्य गरज आहे.

संशोधन पद्धती
या संशोधनात गुणात्मक (Qualitative) संशोधन पद्धती अवलंबली आहे.
- स्वरूप सैद्धांतिक (Theoretical) व ऐतिहासिक (Historical) संशोधन
- प्रकार Descriptive and Analytical Research (वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन)
- दृष्टीकोन डॉ. राधाकृष्णन यांच्या साहित्य, भाषणे, लेखन व दुय्यम साधनांवर आधारित अभ्यास

**संशोधन प्रक्रियेची पावले**
1. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचे संकलन
2. संबंधित साहित्याचे वर्गीकरण
3. संकल्पनात्मक चौकट तयार करणे
4. विषयानुरूप विश्लेषण व तुलना
5. निष्कर्ष व शिफारसी मांडणे

**संशोधन साधने**
**1. या संशोधनात मुख्यतः साहित्याधारित साधने वापरली आहेत**
प्राथमिक साधने (Primary Sources)
- डॉ. राधाकृष्णन यांचे ग्रंथ
- डॉ. राधाकृष्णन यांचे व्याख्याने व भाषणे
- डॉ. राधाकृष्णन यांचे जीवनचरित्राशी संबंधित साक्षी

**2. दुय्यम साधने (Secondary Sources)**
- शैक्षणिक व तत्त्वज्ञानविषयक संशोधन लेख
- संदर्भ ग्रंथ
- शोधनिबंध, संशोधन अहवाल
- UGC Care, Peer reviewed journals, e-resources] ग्रंथालयातील संग्रह

**संशोधनाची जनसंख्या**
या संशोधनाचा उद्देश तत्त्वज्ञानात्मक विचारांचा अभ्यास असल्यामुळे पारंपरिक अर्थाने व्यक्तींची संख्या किंवा भौगोलिक क्षेत्र ही जनसंख्या न ठरता
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांशी संबंधित साहित्य व स्रोतच जनसंख्या म्हणून मानले गेले आहेत.
**जनसंख्येतील घटक**
1. डॉ. राधाकृष्णन यांचे प्रकाशित ग्रंथ, भाषणे, लेख
2. डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांवरील संशोधन निबंध व पुस्तके
3. भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म व शिक्षणविषयक साहित्य
4. पाश्चिमात्य शिक्षण व तत्त्वज्ञानाशी तुलना करणारे ग्रंथ
5. सरकारी व शैक्षणिक संस्थांचे अहवाल, धोरण पत्रके

**संशोधनातील न्यादर्श निवड**
- या संशोधनात Purposive Sampling (उद्देशपूर्ण नमुना निवड) पद्धत वापरली आहे.
- संशोधकाने डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रमुख ग्रंथांचा व त्यांच्या वर झालेल्या महत्त्वपूर्ण अभ्यासांचा निवडक नमुना घेऊन सखोल विश्लेषण केले आहे.

**डेटा संकलनाची साधने**
**या संशोधनात प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे**
**प्राथमिक साधने**
- डॉ. राधाकृष्णन यांचे भाषणसंग्रह, पत्रे व ग्रंथ
- शैक्षणिक परिषदा व स्मारक भाषणे

**दुय्यम साधने**
- भारतीय व पाश्चिमात्य विद्वानांचे संशोधन ग्रंथ
- शोधनिबंध व समीक्षात्मक लेख
- विद्यापीठीन ग्रंथालयातील संदर्भ पुस्तके
- इंटरनेटवरील शैक्षणिक व तत्त्वज्ञानविषयक डेटाबेस

**डेटा विश्लेषण पद्धती**
या संशोधनात गुणात्मक विश्लेषण (Qualitative Analysis) पद्धत वापरली आहे.
- **Content Analysis:** डॉ.राधाकृष्णन यांच्या साहित्याचा आशय विश्लेषण
- **Comparative Analysis:** भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची तुलना
- **Thematic Analysis:** डॉ.राधाकृष्णन यांच्यात्तील प्रमुख तत्त्वज्ञानात्मक संकल्पना व शैक्षणिक मूल्यांची विभागणी
- **Critical Interpretation:** डॉ.राधाकृष्णन विचारांची चिकित्सक समीक्षा

**निष्कर्ष**
**या संशोधनाच्या आधारे मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे**

**1. भारतीय तत्त्वज्ञानाचा जागतिकीकरण**
- डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय अध्यात्म, वेदांत व अद्वैत तत्त्वज्ञानाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचवले.
- डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय संस्कृतीची जागतिक स्तरावर प्रतिष्ठा निर्माण केली.

**2. शिक्षणातील आध्यात्मिक मूल्ये**
- डॉ. राधाकृष्णन यांच्या मते शिक्षण केवळ ज्ञानार्जनासाठी नसून व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे.
- डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षणाला आत्मसाक्षात्कार व नैतिक मूल्यांच्या विकासाशी जोडले.

**3. पूर्व–पश्चिम समन्वयाची संकल्पना**
- डॉ. राधाकृष्णन यांनी पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील विवेकवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन आणि भारतीय तत्त्वज्ञानातील अध्यात्म व नैतिकता यांचा सुंदर समन्वय घडवून आणला.

**4. मानवतावादी विचार**
- डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांमध्ये मानवाचे कल्याण, समानता, सहिष्णुता व बंधुता यांना प्राधान्य दिले गेले आहे.
- धर्म व तत्त्वज्ञानाचा उपयोग मानवतेसाठी असावा हे डॉ. राधाकृष्णन यांनी प्रतिपादन केले.

**5. शिक्षकाची भूमिका**
- शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या चारित्र्य व मूल्यनिर्मितीत मार्गदर्शक असावा, ही त्यांची धारणा होती.
- डॉ. राधाकृष्णन यांच्यामुळे भारतीय शिक्षण, तत्त्वज्ञान अधिक सर्वंकष व प्रासंगिक ठरते.

**6. राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीयता**
- डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय राष्ट्रवादाची मांडणी केली, पण तो संकुचित नसून जागतिक शांतता व सहजीवनाशी जोडलेला आहे.

**शिफारशी**
**या संशोधनाच्या आधारे पुढील शिफारशी करता येतात**

**1.** शैक्षणिक धोरणात तत्त्वज्ञानात्मक मूल्यांचा समावेश
- सध्याच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात (NEP 2020) डॉ. राधाकृष्णन यांचे मूल्याधिष्ठित शिक्षणतत्त्वज्ञान समाविष्ट करणे गरजेचे आहे.

**2. शिक्षक शिक्षण कार्यक्रमांत सुधारणा**
- शिक्षकांनी ज्ञानासोबतच नैतिकता, सहिष्णुता व अध्यात्मिक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवावीत.

**3. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यासक्रमात समावेश**
- शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात राधाकृष्णन यांच्या विचारांवर आधारित घटकांचा समावेश करून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची जाण करून द्यावी.

**4. संवाद व समन्वयाची भूमिका वाढवणे**
- जागतिकीकरणाच्या काळात पूर्व व पश्चिम विचारसरणीतील संवाद व समन्वयासाठी शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करावेत.

**5. संशोधन व अभ्यास केंद्र स्थापन करणे**
- विविध विद्यापीठांमध्ये ष्डॉ. राधाकृष्णन अभ्यास केंद्रष स्थापन करून त्यांचा तत्त्वज्ञान व शिक्षणातील योगदानाचा सखोल अभ्यास प्रोत्साहित करावा.

**पुढील संशोधनासाठी विषय**
1. डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांचा राष्ट्रीय शिक्षण धोरण–2020 शी तुलनात्मक अभ्यास.
2. डॉ. राधाकृष्णन यांच्या तत्त्वज्ञानाचा आधुनिक भारतीय समाजातील नैतिक अधःपतनावर उपाय म्हणून अभ्यास.
3. डॉ. राधाकृष्णन व इतर भारतीय शिक्षणतत्त्वज्ञ (गांधी, विवेकानंद, टिळक) यांची तुलनात्मक समीक्षा.
4. डॉ. राधाकृष्णन यांच्या विचारांचा जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये प्रभाव.
5. डिजिटल युगातील शिक्षण व डॉ.राधाकृष्णन यांची अध्यात्मिक तत्त्वज्ञानात्मक दृष्टी – एक चिकित्सक अभ्यास.

**निष्कर्ष**
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारतीय शिक्षणतत्त्वज्ञानाचे अद्वितीय द्रष्टे होते. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला जागतिक पातळीवर मान्यता मिळवून दिली आणि अध्यात्म, नैतिकता, मानवतावाद व सहिष्णुता यांना शिक्षणाशी जोडले. त्यांच्या विचारांमध्ये पूर्व–पश्चिम समन्वय, राष्ट्रवाद, जागतिक शांतता व व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य दिले गेले आहे. आजच्या काळात जेथे शिक्षण

अधिकाधिक तंत्रज्ञानाधिष्ठित, भौतिकवादी आणि स्पर्धात्मक होत आहे, तेथे राधाकृष्णन यांचे मूल्याधिष्ठित शिक्षणतत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरते. त्यांच्या विचारांचा अभ्यास करून सध्याच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या (NEP 2020) अंमलबजावणीस अधिक मानवी व मूल्याधिष्ठित दिशा देता येईल.

**या संशोधनातून पुढील मुद्दे स्पष्ट झाले**

- डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षणाला आत्मसाक्षात्कार व नैतिक विकासाचे साधन मानले.
- शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून मूल्यांचा प्रसारक व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा शिल्पकार आहे.
- शिक्षणामध्ये अध्यात्मिक मूल्ये, मानवी ऐक्य व आंतरराष्ट्रीय शांततेवर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.
- भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा समन्वय त्यांनी प्रभावीपणे मांडला.
- त्यांच्या विचारांचा उपयोग आजच्या जागतिकीकरण, डिजिटल युगातील शिक्षण आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीत करता येऊ शकतो.

**संदर्भ सूची**


1. Radhakrishnan S. Indian Philosophy: Vol- I- London: George Allen Unwin, 1929, 45-68.
2. Radhakrishnan S. The Hindu View of Life- London: George Allen Unwin, 1931, 101-135.
3. Radhakrishnan S. The Bhagavadgītā: With an Introductory Essay Sanskrit TeÛt English Translation and Notes- London: George Allen Unwin, 1953, 27-59.
4. Radhakrishnan S. Recovery of Faith- New York: Harper & Row, 1962, 89-112.
5. Radhakrishnan S. An Idealist View of Life- London: George Allen Unwin, 1969, 152-176.
6. Chatterjee SC. Datta DM. An Introduction to Indian Philosophy- Calcutta: University of Calcutta, 1984, 212-240.
7. Hiriyanna M. Outlines of Indian Philosophy- Delhi: Motilal Banarsidass, 1993, 310-329.
8. Sharma CA. Critical Survey of Indian Philosophy- Delhi: Motilal Banarsidass, 2000, 365-388.
9. Pande GC. Life and Thought of Radhakrishnan- Delhi: Motilal Banarsidass, 2001, 75-101.
10. Ranganathananda S. Human Being in Depth: A Scientific Approach to Religion- Delhi: Vivekananda Kendra Prakashan, 2004, 56-72.
11. Sharma RN. Philosophy of Education- Delhi: Kanishka Publishers, 2012, 189-205.
12. Mohanty JN. Classical Indian Philosophy- Delhi: OÛford University Press, 2014, 245-268.